| **Publication** – Janpravas | **Page No** - 03 |
|---|---|

# आशियाचे सर्वात मोठ्या रबर प्रदर्शनाचे आयोजन मुंबईमध्ये जानेवारी २०१९ मध्ये होणार

**पुणे । प्रतिनिधी**

इंडिया रबर एक्सपो(आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे, २००१मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हा पासून तो आज रबर उद्योगातील सर्वात जास्त अपेक्षित कार्यक्रमांपैकी एक आहे. आता १०वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बॉंबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या आघाडीच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन या १९४५ मध्ये स्थापना झालेल्या देशातील सर्वात जुन्या प्रिमियर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे. ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनची स्थापना भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली होती, आज ही संस्था १२००+ सक्रिय सभासदांसोबत विस्तीर्ण संबंधासोबत उद्योगाचा आवाज बनली आहे. इंडिया रबर एक्सपो २०१९ आंतरराष्ट्रीय मानकांना पूर्ण करण्याकडे, जगभरातील औद्योगिक व्यावसायिकांचे इंडिया रबर एक्सपो, मुंबई येथे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत सहयोग करण्यासाठी आगळावेगळा मंच मिळत आहे. विकसित होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसयऱ्या सर्वात जलद गतीने प्रगती करणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे.